

# भावपूर्ण श्रद्धांजली ...

जळगाव तरुण भारत पान ७
बुधवार, दि. २६ मार्च २०१४

# धारणेला प्रामाणिक राहून जे जगतात, तेच उज्ज्वल इतिहास निर्माण करतात...

**श्रध्देय दादांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त तरुण भारतच्या वतीने आयोजित सत्कार सोहळ्यात जैन इरिगेशन सिस्टीम्सचे अध्यक्ष व दादांचे अभिन्न मित्र असलेल्या भवरलालजी जैन यांनी व्यक्त केलेल्या भावना... त्यांच्याच शब्दात... दादांना श्रद्धांजली म्हणून...**

दादांच्या हाइटला अॅडजेस्ट केलेला हा माइक, माझ्या हाइटला आधी अॅडजेस्ट करून घेतो. (हशा...)

निःस्वार्थ समाजसेवा करणाऱ्या डॉ. अविनाश आचार्य तथा दादांचे अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त सर्वप्रथम अभीष्टचिंतन करतो! एवढ्या उंच माणसाजवळ, एवढी नम्रता! (टाळ्या...) औपचारिकेचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला स्पर्शही नाही. निरलस, निर्मोही, सतत नवनिर्माणाचा वेध असणारे अत्यंत विनयशील व्यक्तिमत्त्व म्हणजे दादा! (टाळ्या...) जे. डी. सी. सी. बँकच्या या हॉलमध्ये सत्काराच्या निमित्ताने उपस्थित राहण्याचे दोन-तीन प्रसंग मला आठवतात. एवढा भरगच्च भरलेला हॉल मात्र आज मी दुसऱ्यांदा पाहतो आहे! (टाळ्या...) साधारणपणे सत्कार म्हटला म्हणजे, एका ठराविक कार्यक्रमाची रूपरेषा आपल्या मनात आपण कल्पलेली असते. ज्यांचा गौरव सोहळा आहे, त्यांच्याविषयी स्तुतिसुमनांची शब्द ओंजळ वाहिली जाईल. चाकोरीबद्ध भाषणे होतील. हार-गुच्छ, शाल श्रीफळ दिले धारणेला प्रामाणिक राहून जे जगतात, तेच उज्ज्वल इतिहास निर्माण करतात जैन हिल्सवरील जाईल. यापलीकडे विशेष वेगळे असे त्या कार्यक्रमात होणार नाही अशा पद्धतीची एक नेहमीची धारणा अनेकांची झालेली असल्यामुळे काही माणसांचा अशा सोहळ्याकडे दुर्लक्ष करण्याचा कल वाढतच चालला आहे. आणखी एक गोष्ट अधोरेखित करायलाच हवी, चांगल्या माणसांच्या सत्काराला तर उपस्थिती अगदी कमीच असते. (हशा...) समाजाचा जणूकाही असा दंडकच झाला आहे.


आजच्या या सोहळ्याचे चित्र मात्र पूर्णपणे वेगळे आहे. माणसे केवळ शरीराने नाही, तर मनानेही उपस्थित आहेत, त्यामुळे एवढी उपस्थिती पाहूनही मला त्याचे आश्चर्य वाटत नाही, कारण ते होणारच होते. आयुष्यात योगायोगाने प्रसंग कसे समोर येऊन ठाकतात, पाहा, दादांना आणीबाणीच्या काळात दीड वर्षांची शिक्षा झाली, त्या शिक्षेपेक्षाही, आता ही सत्काराच्या माध्यमातून होणारी दीड तासाची शिक्षा फार मोठी आहे, असे मला वाटते. (हशा...) एकतर त्यांना स्तुती ऐकण्याची अजिबात सवय नाही. ते स्वतःविषयी कमी बोलतात, काम मात्र खूप करतात. (टाळ्या...) सत्तेशिवाय सेवा नाही हे समीकरण अनेकांच्या डोक्यात घट्ट बसले आहे. 'सत्ता' हवी म्हणून, येन केन प्रकारेण अनेक युक्त्या, क्लृप्त्या योजून सत्ता हस्तगत करणारे अनेक असतात. सत्ता मिळालीच तर सेवेचेही थोडेफार पाहू- असो; तो स्वकेंद्रित दृष्टिकोन असतो. अशा सर्व विचारव्यूहाला छेद देणारा माणूस कोण? तर आजचे सत्कारमूर्ती आदरणीय डॉ. आचार्य! (टाळ्या...) सत्तेशिवाय सेवा करता येते, चांगली सेवा करता येते, हे दादांनी कृतीतून केव्हाच सिद्ध केले आहे. केशवस्मृती प्रतिष्ठानच्या पंचवीस, विविध प्रकल्पांतून आदर्श कार्यसंहितेचा एक भरभक्कम वटवृक्षच त्यांनी उभा केला. विधायक रचनात्मकता हा दादांच्या वृत्तीचा सर्वात मोठा, मूलभूत गुणविशेष आहे. स्वतःचे व्यक्तिमहात्म्य वाढविले जाऊ नये, विधायक कार्याला आणि सेवाभावी कार्यकर्त्याला प्राधान्य मिळावे, याचा त्यांनी कायम कटाक्ष बाळगला आहे. दादांचे वडील सिद्धहस्त यशस्वी डॉक्टर होते. समाजसेवेची त्यांना जाणीव होती. दादांच्या आईनेसुद्धा भगिनी मंडळांच्या धारणेला प्रामाणिक राहून जे जगतात, तेच उज्ज्वल इतिहास निर्माण करतात माध्यमातून महिला भांडाराची कल्पना त्या वेळी मांडली आणि प्रत्यक्ष साकारही केली. समाजसेवेचे बाळकडू घरातच लाभलेल्या दादांनी आपल्या वैयक्तिक व्यवसायाचे सार्वजनिक न्यासात रूपांतर करून आपल्या जीवनाची दिशा संपूर्णपणे समाजहितैषी केली. दादांच्या मार्गदर्शनाने सुरू असणारे प्रकल्प समाजाच्या दृष्टीने एवढे उपकारक का ठरले? ह्याचे सर्वात मोठे, प्रबळ कारण म्हणजे दादांमधील निरपेक्ष सेवाभाव हेच होय! (टाळ्या...) मोठे प्रकल्प व्यवस्थितरीत्या चालवण्यासाठी माणसे तशी जोडावी लागतात. माणसे घडवावीही लागतात, व्यवस्थापन कौशल्य तर अपरिहार्य बाब आहे. कितीही प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाली तरी जबरदस्त इच्छाशक्ती टिकवून ठेवावी लागते. दादांमध्ये हे गुण आहेतच. शिवाय या गुणांसोबतच संघटनशास्त्राचे मूर्त रूप म्हणजे दादा आहेत. (टाळ्या...)

चांगली माणसे जोडताना दादांनी कोणत्याही जातीची, धर्माची सीमारेषा आखून घेतली नाही. अतिशय व्यापक मनाने सर्वांना सामावून घेतले. अशा वेळी काही किंमतही माणसाला मोजावी लागते. अंगी प्रचंड सहनशीलता असावी लागते. सर्वांशीच आपले सर्व विचार जुळतात असे होत नाही; पण जिथे जिथे विचारांचे नाते जुळते, ती सकारात्मक बाजूच फक्त पाहून पुढची वाटचाल करावी लागते, दादांना हे सर्व करावे लागले, त्यासाठी जी विलक्षण प्रगल्भता लागते, ती दादांजवळ आहे, म्हणूनच आपल्याला दादांविषयी एवढा आदर आहे. सज्जनशक्तीत अग्रक्रमाने, अग्रस्थानी, अग्रगौरवाचे मानकरी या नात्याने कुणाला स्थान द्यावे? दादांसारख्या सन्मित्रांना! दादांच्या या सज्जन कार्यप्रणालीचा विचार करता ते घडले तरी कोणत्या मुशीत, हे जाणून घेणेही फार महत्त्वाचे आहे. दादा संघ संस्कारांचे आहेत. कार्यकर्त्यांमध्ये त्यांनी हा संघविचार सातत्याने प्रज्वलित ठेवला आहे. एक आदर्श, सुसंस्कृत कुटुंबप्रमुख यादृष्टीने त्यांच्याकडे पाहिले जाते. दादांचा १९४० पासून संघाशी संबंध आला, तो आजीवन! संघाचा स्वयंसेवक म्हटला म्हणजे समाजाची त्या माणसाकडे पहाण्याची एक दृष्टी आहे. विशिष्ट निकषाने स्वयंसेवकांकडे पाहिले जाते. संघाचा माणूस एकतर अत्यंत शिस्तप्रिय, सेवाभावी, प्रामाणिक, सद्वर्तनी, सच्चा माणूस! स्वयंसेवक असाच असला पाहिजे, असे सर्वांना वाटते. त्यादृष्टीने विचार केल्यास, सर्व निकषांमध्ये सर्वश्रेष्ठ ठरलेला एक माणूस मी अगदी जवळून पाहिला, अनुभवला- डॉ. अविनाश आचार्य! (टाळ्या...)

**भवरलाल जैन**

माझा आणि दादांचा सहवास खूप वेळा घडला आहे, असेही नाही. पण तरीही दोघांमध्ये एक आंतरिक विशास आहे, सामंजस्य आहे, परस्परांचे विचार समजून घेण्याची क्षमता आहे. दादांना अगदी ठाम विशास असतो. त्यातूनच ते अनेक उपक्रमांची विशिष्ट जबाबदारी माझ्याकडे सोपवतात. भवरलालजी आहेत म्हणजे काही अडचण नाहीत, असा त्यांचा दृढविश्वास आहे. ते स्वतःला पुढे ठेवणार नाहीत. पण चांगले, मोठे काम असेल तर कार्यकर्त्यांना 'तुम्ही भाऊंकडे जा,' हे सांगायलाही ते मागेपुढे पाहत नाही. म्हणूनच सदृश्यपणे तर कधी अदृश्यपणे दादाची आठवण मला येतच राहते. कार्य चांगले असावे, भूमिका पारदर्शक ठेवावी, समाजोपयोगी काम करणारी व्यक्ती कोण आहे? हे भले नंतर पाहू, आधी त्या व्यक्तीच्या कामाचा विचार करू, असा त्यांचा सरळ दृष्टिकोन आहे. अतिशय प्रामाणिकपणे, सदाचारी वृत्तीने त्यांनी वैद्यकीय सेवा केली. तोच प्रामाणिकपणा जीवनाच्या प्रत्येक दालनात काटेकोरपणे जपला. दादांना गडगंज पैसा कमावण्याची खूप संधी होती; परंतु सेवेचं व्रत अंगीकारल्यानंतर अर्थ समृद्धीचे इतर मार्ग त्यांनी कटाक्षाने नाकारले. सगळ्यांना हे व्रत अंगीकारता येईल का? सत्तेशिवाय सेवा प्रकल्प साकार करता येतील का? तेही आजच्या भौतिक काळात? साहजिकच असे अनेक प्रश्न तुमच्या-आमच्या अगदी सर्वांच्या समोर उभे राहतात. ज्या-ज्या वेळी असे संभ्र मनात थैमान घालायला लागतात, हे शक्य तरी आहे का? असे सारखे वाटत राहते. त्या वेळी फक्त एकच गोष्ट आपण करावी-दादांकडे पहावे! (टाळ्या...) त्यांच्या सत्कार्याकडे पाहावे, त्यांनी उभ्या केलेल्या चालत्या-बोलत्या इतिहासाकडे दृष्टिक्षेप टाकावा आपली खात्री पटते, पूर्णपणे पटते. हो हे घडू शकते, हे शक्य आहे. प्रामाणिकतेच्या भरभक्कम पायावर हेही शक्य आहे. Honesty is the best policy, is a old saying असे उद्‌गार आजची पिढी काढताना दिसते. या पिढीला वाटते, प्रामाणिकपणा बाळगून काहीच जमण्यासारखे नाही. त्यांच्या आजच्या धकाधकीच्या वेळापत्रकात, धारणेला प्रामाणिक राहून जे जगतात, तेच उज्ज्वल इतिहास निर्माण करतात

शॉर्टकटच्या मार्गात प्रामाणिकपणाचा फॉर्म्युला काही मॅच होत नाही. Honesty is the worst policy, best policy नाहीच. अर्थात, या तरुण पिढीचे हे विचार त्यांना येणाऱ्या अनुभवातून आले आहेत. मला या तरुण पिढीविषयी, निश्चितच आकस नाही; पण 'प्रामाणिकपणा' या मूल्याला माझ्या दृष्टिकोनातून खूप महत्त्व आहे. आणखी एक महत्त्वाची गोष्ट अशी आहे, की व्यवहारात प्रामाणिकपणा जोपासायचा म्हटला, तर त्याग हा करावाच लागतो, स्वतः काही कळ सोसावी लागते, किंमत मोजावी लागते,



ती कळ सोसायला, तेवढी किंमत मोजायला जी समर्पणशीलता लागते ती अनेकांमध्ये नसते. पैसा दिल्याशिवाय कामेच होणार नाही. हे सोदाहरण स्पष्ट करण्यासाठी ते अनेक घटना-प्रसंगांची मालिकाच आपल्यासमोर सादर करतात.

पैसा हाच धर्म-अशा विचाराला धरूनच सातत्याने बोलणे, असल्यामुळे या युवा पिढीच्या आयुष्याला वळण अशा गोष्टीतून पडत जाते. दादांनी असा मार्ग अगदी 'जागरूकपणे दूर ठेवला. परिस्थिती कोणतेही रूप घेऊन समोर आली, तरी ते आपली सत् प्रवृत्तीची वाट विसरले नाहीत. प्रचंड सहनशीलता, समर्पणशीलता, त्यांच्यात आहे. विचारांची शुद्धता, सकारात्मकता आयुष्यात अत्यंत महत्त्वाची आहे. इतरांची विचार जाणून घ्यावे लागतात. प्रत्येकाचे विचार प्रत्येक वेळी बरोबर असतीलच हे सांगता येत नाही. कारण तो perception चा भाग आहे. ज्याच्या त्याच्या धारणेवर ते अवलंबून असते. परंतु धारणेला प्रामाणिक राहून जे जगतात, तेच उज्ज्वल इतिहास निर्माण करतात! तसा इतिहास निर्माण करण्याचे भाग्य दादांना लाभले. (टाळ्या...) मित्रांनो, मी दादांपेक्षा वयाने पाच वर्षांनी लहान आहे. अर्थात, हे समजायला दादांची पंचहात्तरी यावी लागली. (हशा...) आत्तापर्यंत असा एकही प्रसंग घडला नाही, की दादांनी वयाच्या या फरकाची जाणीव मला करून दिली. त्यांनी नेहमीच असे भासवले, की तेच माझ्यापेक्षा एका वर्षाने लहान आहेत. ज्या ज्या कार्यक्रमांना आम्ही व्यासपीठावर एकत्र आलो, त्या त्या वेळी दादा मला अत्यंत प्रेमाने, आदराने म्हणाले, 'भाऊ, तुम्ही मुख्य स्थानावर बसा' मी तितक्याच शांतपणे त्यांना म्हणालोही, 'डॉक्टर साहेब, आपण मला वरिष्ठ आहात, आपणच तिथे बसा.' अशा वेळी दादा कधीही काही बोलले नाही, फक्त एक छानसे, मंदस्मित त्यांच्या चेहऱ्यावर मला पहायला मिळायचे. अगदी महाभारतातल्या त्या 'नरो वा कुंजरोवा' सारखी अवघडलेली स्थिती माझी व्हायची. (हशा...)

समाजालाच आई मानून, निःस्वार्थ प्रेमाची शिकवण देणारे दादा खऱ्या अर्थाने आजच्या गौरवाला पात्र आहेत. त्यांच्या गौरवगाथेचे शीर्षक, 'सेवासमिधा' आहे, ते खूपच सूचक आहे., 'समिधा' म्हणजे यज्ञकुंडात टाकलेल्या पवित्र वस्तू, होमकाष्ठ. या होमकाष्ठाची समर्पणशीलता इथे आहे. कार्य हाच एक यज्ञ आहे. स्वतः श्रेष्ठ असूनही इतरांना सन्मान देणे हे वाटते तितके सोपे काम नाही अशी कला मला साधलेली नाही; पण हे नक्कीच, की, मला व्यक्तीच्या कर्तृत्वाची प्रचीती आली तर, ती व्यक्ती वयाने लहान असली तरी त्याचे चरणस्पर्श करायला माझे मन संकोचत नाही. जन्मदात्या आई-वडिलांविषयीसुद्धा कृतज्ञता दाखवणे आजच्या अनेक मुला-मुलींना कमीपणाचे वाटते. 'आम्ही एवढे उच्चशिक्षित, आई- वडील तर शिकलेच नाहीत. कशाला कृतज्ञता बाळगायची? त्यांनी जन्म दिला, धारणेला प्रामाणिक राहून जे जगतात, तेच उज्ज्वल इतिहास निर्माण करतात वाढवले, शिक्षण दिले हे तर त्यांचे कर्तव्य होते, म्हणून त्यांनी केले,' अशी एक वेगळी विचारधारा अनेक कुटुंबांत पाहायला मिळते आहे. अशा कौटुंबिक नात्यांच्या तणावग्रस्त परिस्थितीत, इथे एका अशा माणसाचा समाज सत्कार करतो आहे, ज्या माणसाने सतत इतरांची सेवा करण्यातच धन्यता मानली. एवढेच नव्हे; तर आपण इतरांसाठी काय केले हे किंचितही लक्षात न ठेवता, इतरांनीही आपल्यासाठी काय काय केले, याची जाणीव मात्र प्रत्येक क्षणाला ठेवली, ऋणात उतराई होण्याचा सातत्याने प्रयत्न केला समाजाकडून आपण भरभरून घेत असतो. आयुष्यभर खूपकाही घेत असतो. प्रत्येक क्षणाला घेत असतो. पण देतो काय. हा प्रश्न प्रत्येकाने खरोखरच स्वतःला विचारला पाहिजे. दादांनी मात्र हा विचार केवळ केलाच नाही तर, सतत आचरणात आणला. आपल्याला थोडाफार कामाचा अहंम् येतो. या अहम्‌चा सुईच्या अग्राएवढाही स्पर्श दादांना झाला नाही.